MHAH230003822024

**नियमित दावा क्र. १५८/२०२४ मधील नि. २१ वरील आदेश.**

( भाउ बापूराव कातोरे वगैरे २ वि.अजुर्न गंगाराम कातोरे वगैरे २ )

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे ग्रामपंचायत, उक्कडगाव यांच्या ठरावाची प्रत दाखल करुन घेण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर त्यांचे म्हणणे देऊन अर्जास आक्षेप नोंदवला.

४. वादीने प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीद मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला असून प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी जे कागदपत्र दाखल करु इच्छीत आहेत ते म्हणजे ग्रामपंचायतीच्या ठरावाची प्रमाणित प्रत आहे. त्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यास मदत होणार आहे. तसेच सदर कागदपत्रास शाबीत केल्याशिवाय निशाणी देता येणार नाही. तसेच प्रतिवादी यांना सदर कागदपत्राबाबत उलटतपास घेण्याची संधी असणार आहे. सबब सदरचा दस्त दाखल करण्याची विनंती **मंजूर**. येणेप्रमाणे अर्ज अंशतः मंजूर.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.08.18 16:25:06 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १८/८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.